# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २०१-२२ दिनांक : ०२/०७/२०२१

## मोटार सायकल चोरी करणा-या विधिसंघर्षग्रस्त बालकाकडुन १० मोटारसायकल स्कुटर जप्त - गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष -१ यांची कामगिरी

मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय यांनी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांना आळा बसविण्यासाठी मोटार सायकल चोरांचा शोध घेण्याचे आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष -१ यांनी तांत्रीक विश्लेषन व मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दिनांक ०२/०७/२०२२ रोजी गुन्हे करणारा विधिसंघर्षग्रस्त बालक मुळ रा. के गाव, फुलवाडी, धनगडी, देश-नेपाळ यास नयानगर, मिरारोड पुर्व येथुन ताब्यात घेण्यात आले .

सदर विधिसंघर्षग्रस्त बालकाकडे अधिक तपास करता त्याने मिरारोड परिसरात रात्रीच्या वेळी मोटार सायकल स्कुटर चोरी करुन त्या वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवल्याचे सांगितले. त्याचेकडुन एकुण १० स्कुटर्स त्यात ०५ ॲक्टीव्हा, १ डिओ, १ यामाहा फसिनो, १ प्लेझर तसेच त्याने चोरी केलेल्या इतर ०२ स्कुटर अशी वाहने जप्त करण्यात आली आहेत. तसेच त्याचा खालील गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न झाला असुन खालीलप्रमाणे गुन्हे ऊघडकीस आले आहेत.

| अ. क्र. | पोलीस ठाणे | गु.नो.र.क्र | मो.सा. व मुळ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नयानगर | I ४५६/२०२२, भादवि कलम ३७९ | ॲक्टिवा MH-04-FY-1932 |
| २. | नयानगर | I ४७६/२०२२, भादवि कलम ३७९ | ॲक्टिवा MH-04-GY-8767 |
| ३. | नयानगर | I ४०१/२०२२, भादवि कलम ३७९ | ॲक्टिवा MH-04-JG-1742 |
| ४. | नयानगर | I ४३३/२०२२, भादवि कलम ३७९ | ॲक्टिवा MH-04-GQ-3216 |
| ५. | नयानगर | I ४३४/२०२२, भादवि कलम ३७९ | यामाहा फसिनो MH-04-HG-0477 |
| ६. | नयानगर | I ४४१/२०२२, भादवि कलम ३७९ | यामाहा फसिनो MH-02-EJ-2666 |
| ७. | नयानगर | I ४८०/२०२२, भादवि कलम ३७९ | डिओ MH-04-HP-6327 |
| ८. | नवघर | I ४८८/२०२२, भादवि कलम ३७९ | प्लेझर MH-02-DE-7972 |
| ९. | नवघर | I ४९८/२०२२, भादवि कलम ३७९ | ॲक्टिवा TN10AB6905 |
| १०. | मिरारोड | I २६१/२०२२, भादवि कलम ३७९ | ॲक्टिवा MH-04-GW-7592 |

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अविराज कुराडे, पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष -१, सहा. पो.निरी. कैलास टोकले, पो.उप-निरी. हितेंद्र विचारे, सहा. फौज. संदीप शिंदे , किशोर वाडिले, पोहवा. अविनाश गर्जे, पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, संतोष लांडगे , मुस्तकीम पठाण, पो.अं. सुमित जाधव, प्रशांत विसपुते, यादव यांनी केली आहे.




........ooooo.........